जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'सिनेट'साठी जोरदार रस्सीखेच

**शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या (सिनेट) सदस्यत्वासाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार या निवडणुका घेण्यात येणार आहेत. १७ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तर २० नोव्हेंबर रोजी मतमोजणी व निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीच्या रिंगणात असलेले उमेदवार, एकूण जागा, संघटनांच्या पातळीवर सुरू असलेल्या बिनविरोध निवडीच्या हालचाली याबाबत.**



**नवीन विद्यापीठ कायद्यानुसार शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळांची निवडणूक होत आहे. रिंगणात असलेल्या विविध गटानुसार पदांसाठी काही निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे यंदा उमेदवार हे त्या त्या गटानुसार शैक्षणिकदृष्ट्या व निर्णयक्षमतेच्या पातळीवर सक्षम असतील हा हेतू आहे. ज्या जागा रिक्त आहेत त्यांच्याबाबत विद्यापीठाच्या धोरणानुसार निर्णय घेतला जाईल. नियमावली आणि निकषअटींच्या आधारे निवडणूक पारदर्शीपणे पार पाडण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने तयारी सुरू आहे.**

**- डॉ. विलास नांदवडेकर, निवडणूक निर्णय अधिकारी**

## जागा दृष्टिक्षेपात

- सिनेटमधील एकूण जागा **७६**
- निवडणूक होणाऱ्या जागा **४१**
- पाच खुल्या प्रवर्गातील महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जमाती व इतर मागासवर्गीय यासह दहा पदवीधरांसाठी ही निवडणूक होणार आहे. अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी आणि दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी आणि दोन विद्यार्थी प्रतिनिधी अशा ४१ जागा निवडण्यात येणार आहेत.

## रिक्त जागा

- सिनेट ३
- अॅकॅडमिक कौन्सिल (शिक्षक) २
- अभ्यास मंडळ ७
- प्राचार्य गट १
- विद्यार्थी प्रतिनिधी २

| गट | जागा | उमेदवार |
|---|---|---|
| शिक्षक गट | १० | २८ |
| पदव्युत्तर शिक्षक | ३ | ९ |
| पदवीधर | ९ | ३० |
| अकॅडमीक कौन्सिल शिक्षक | ५ | १० |
| प्राचार्य गट डीटीएनटी | १ | २ |
| शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीतील बिनविरोध उमेदवार | | १५ |
| अभ्यास मंडळावरील बिनविरोध उमेदवार | | ३० |

| गट | मतदार |
|---|---|
| प्राचार्य गट | १३४ |
| कॉलेज शिक्षक (प्राध्यापक १० जागा) | ३३६६ |
| पदव्युत्तर शिक्षक ( विद्यापीठ ३ जागा) | १९७ |
| नोंदणीकृत पदवीधर (१०पैकी ९ जागा) | १४१७२ |
| अभ्यास मंडळे (विभागप्रमुख मतदार) | ८५५ |
| संस्था प्रतिनिधी गट (सहा जागा बिनविरोध) | १२७ |

## शिवाजी विद्यापीठ संलग्न कॉलेज

**२८३** एकूण

**जिल्हा कॉलेजची संख्या**

- कोल्हापूर ११४
- सांगली ८६
- सातारा ८३



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2017
सकाळ

# अधिकार मंडळ निवडणुकीत सोशल मीडियावर प्रचार

## स्वतंत्र ग्रुपद्वारे प्रचाराचे रान; परिसर निवडणूकमय

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठ अधिसभा व विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीचे रान आता सोशल मीडियावर पेटले आहे. 'पहिल्या पसंतीचे मत द्या,' असे आवाहन व्हॉटस्‌ॲपवर केले जात आहे. फोनाफोनीवर मतदान देण्याचे आवाहन केले जात आहे. प्रचारासाठी काही उमेदवारांनी मित्रमंडळींच्या ग्रुपद्वारे तर विकास आघाडीने प्रत्येक उमेदवाराचा प्रचार सोशल मीडियाशी जोडला आहे.

शैक्षणिक क्षेत्राचे आगर समजल्या जाणाऱ्या शिवाजी विद्यापीठात निवडणूक एके निवडणूक असेच वातावरण झाले आहे. एकमेकांचे ग्रुप आपआपल्या प्रतिनिधींचा प्रचार करीत आहेत. प्राध्यापकांची निवडणूक म्हणून याकडे पाहिले जात आहे. त्यामुळे केवळ फोनाफोनी आणि व्हॉटस्‌ॲप ग्रुपद्वारेच प्रचाराला अधिक गती आली आहे. १७ नोव्हेंबरला मतदान असल्यामुळे अवघे पाच-सहा दिवस राहिले आहेत. कोल्हापूरसह सांगली आणि सातारा जिल्ह्यातील मतदारांपर्यंत पोचण्यासाठी बहुतांश उमेदवारांनी थेट सोशल मीडियाचा वापर सुरू केला आहे. पहिल्या पसंतीचे मत द्या, अशी विनंती उमेदवारांकडून केली जात आहे; तर राजकीय पक्षाचे उमेदवार ज्या पद्धतीने पक्षाच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन करतात त्याचप्रमाणे आघाडीचे उमेदवार आपल्या उमेदवारांना विजयी करण्याची विनंती फोनाफोनी करून करीत आहेत. याच प्रमाणे व्हॉटस्अपद्वारे स्वतःच्या छायाचित्रासह 'मी..... सध्या .... निवडणुकीसाठी निवडणूक लढवीत आहे. मला मतदान करा...' अशा आशयाचे छोटे मेसेज पाठविले जात आहेत. तसेच आपल्या मित्रमंडळींनासुद्धा सांगण्याची बिनंती केली जात आहे.



### मतांचे गणित

**साधारण ३३५० मतदान आहे. काही ठिकाणी एक-दोन उमेदवारांत लढत आहे. वस्तुस्थिती पाहता काही उमेदवारांना सहाशे मते मिळाली तरीही ते विजयी होणार आहेत, तर काहींना दीड हजार मतदान अपेक्षित आहे. उमेदवारांच्या संख्येवर विजयी उमेदवारांच्या मताची जुळवाजुळव सुरू झाली आहे. काही प्राध्यापकांनी ओळखीच्या मित्रांकडे सोशल मीडियाची धुरा सोपविल्याचे सांगण्यात येते.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2017
लोकमत

# सोशल मीडियावर रंगली अधिसभा निवडणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यांत विभागल्याने अधिसभा निवडणुकीसाठी येथील मतदारांशी वैयक्तिक संपर्क साधण्यापेक्षा सोशल मीडियाद्वारे अनेक उमेदवारांनी संपर्क साधून आपला हेतू साध्य केला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) व विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीतील दुरंगी लढतीचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर प्रचार शिगेला पोहोचला आहे. 'सुटा' आणि विद्यापीठ विकास आघाडी आमने-सामने आले आहेत. उमेदवारांना तीन जिल्ह्यांतील मतदारांशी संपर्क साधताना मोठी दमछाक होत आहे. यावर व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्राम अशा सोशल मीडियाचा वापर करीत संपर्क साधला. त्यामुळे वेळ, पैसा व श्रम वाचत असल्याने अनेक उमेदवारांनी प्रचारासाठी हा फंडा वापरला आहे.

सतरा नोव्हेंबरला निवडणूक होत आहे. दुरंगी लढतीमुळे प्रचार मोहिमेला कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वेग आला आहे. शिक्षक, प्राचार्य, संस्था चालक, विद्यार्थी या गटातील मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या जात आहेत. अनेक उमेदवारांनी प्रचार मोहीम प्रबळ व्हावी. याकरिता वैयक्तिक गाठीभेटीसह सामाजिक माध्यमांचा वापर प्रभावीपणे केले जात आहे. निवडणुकीची तारीख जशी जवळ येईल, तसे या माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात होणार हे निश्चित आहे. त्यामुळे रणधुमाळी सोशल मीडियावरच अधिक होणार अशी चिन्हे दिसू लागली आहेत.

12 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उमेदवारांची डिजिटल प्रचारात आघाडी

## शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणूक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा अशा तीन जिल्ह्यांचे विस्तीर्ण कार्यक्षेत्र असल्याने मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडियाचा सर्वांनीच वापर सुरू केला आहे. एकप्रकारे प्रचाराचे डिजिटल वॉर सुरू झाले आहे.

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी १७



नोव्हेंबरला मतदान आहे. १४६ जागांपैकी काही जागा बिनविरोध झाल्या आहेत. विविध जागांसाठी २५८ उमेदवार सध्या रिंगणात आहेत. पदवीधर आणि महाविद्यालयीन शिक्षक गटांत मतदारांची आणि उमेदवारांची संख्या जास्त असल्याने लढत तुल्यबळ होणार आहे. विद्यापीठ शिक्षक या गटांतही चुरस आहे. प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांनी सोशल मीडियाचा वापर सुरू केला आहे. निवडून आल्यानंतर कार्यकाळात जे करणार आहे त्याची कार्यक्रमपत्रिकाच उमेदवारांनी मतदारांना पाठवण्यास सुरू केली आहे. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी विरुद्ध सुटा असा थेट सामना असला तरी पदवीधर गटांत शिवाजी विद्यापीठ कृती समितीनेही आव्हान उभे केले आहे. त्यामुळे पदवीधर गटांत चुरस दिसत आहे. पदवीधर गटांत चौदा हजारांहून अधिक सभासद आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2017
Times of India

# SUK invites proposals for hosting Avishkar fest

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited proposals from affiliated colleges to host district-level Avishkar Research Festival scheduled for later next month.

In a circular dated November 7, the varsity has asked its affiliated colleges to send proposals regarding hosting the coveted research festival by November 30.

The district level research festival will be held at a college in Sangli, Satara and Kolhapur district later next month.

The SUK has also invited entries for expert examiner in respective categories of the festival.

The expert examiner will look after the quality of the projects. The examiner has to possess at least 15 years of experience along with a PhD to qualify.

"The last date to send the application for the same is November 30," added the circular.

The festival — an initiative of chancellor's office to boost the research culture among the students and faculty members — has witnessed good response from the participants over the years.

"The festival is organised in six educational categories, including humanities, commerce, pure sciences, agriculture and animal husbandry, engineering and technology, and medicine and pharmacy. The festival is categorised for under-graduate (UG) students, Post-graduate (PG) students, research scholars and faculty members. The expert examiner will look after the quality of the projects in the festival," said an official from the varsity.

"Winners at the district level research festival will advance to the next round of university level central research festival. Similarly, winners from the university level central research festival will advance to the state level research festival which will be organised next year," added the official.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2017
पुढारी

# लाईफस्टाईल मॅनेजमेंट संपूर्ण आरोग्य विषयावर मोफत कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्रामार्फत पन्नास वर्षांवरील स्त्री व पुरुषांसाठी 'लाईफ स्टाईल मॅनेजमेंट संपूर्ण आरोग्य' या विषयावर मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळा प्रत्येक आठवड्यातील एक दिवस व एक तास होईल. यामध्ये आहार, व्यायाम, ताण आदी गोष्टींवर मार्गदर्शन केले जाणार आहे. १३ नोव्हेंबर दुपारी ३ वाजता कार्यशाळेस सुरुवात होणार आहे. लोकविकास केंद्र येथे याचे उद्‌घाटन होणार आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक लोकविकास केंद्र शिवाजी विद्यापीठच्या डॉ. मंजुषा देशपांडे यांनी केले आहे.